International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण उद्योगांची स्थिती (1977-1998)

**प्रा. डॉ. पी. डी. जाधव[1], प्रा. डॉ. के. एस. नवसागरे[2]**
*[1,2] गो.सी.गावंडे महाविद्यालय, उमरखेड, जि. यवतमाळ*
*Corresponding Author – प्रा. डॉ. पी. डी. जाधव*
**DOI - 10.5281/zenodo.15240799**

**सारांशः-**

राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत ग्रामीण उद्योग, गृह उद्योग व लघु उद्योग यांची भूमिका महत्त्वाची आहे. राज्यातील नागरी व ग्रामीण भागातील असमतोलपणा कमी होतो. ग्रामीण भागात बिगर कृषी क्षेत्रातील रोजगारांच्या पातळीत वाढ झाली आहे. ग्रामीण भागातील ग्रामीण उद्योगात व लघू उद्योगात वीज यंत्रसामुग्री यांच्या वापराच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे त्यांच्या रचनेत बदल झाला आहे.

ग्रामीण भागातील उद्योग व लघुउद्योग यांच्या संख्यावाढीमुळे कृषी क्षेत्रातील लोकसंख्या वाढीचा भार कमी होत आहे. ग्रामीण भागातील बेकारांना रोजगार प्राप्त झाला आहे. त्यांचे उत्पन्न वाढले आहे. राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. दारीद्रयाच्या प्रमाणात घट होत आहे.

**प्रास्ताविक:**

महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागात बेकारी, अर्धबेकारी, दारीद्रय व उपासमार या महत्वाच्या समस्या आहे. त्या सोडविण्यासाठी उत्पादक स्वरूपाचा रोजगार निर्माण करणे हाच एकमेव उपाय आहे. ग्रामीण भागात कमी भांडवल गुंतवणुकीतून जास्तीत जास्त रोजगार निर्मिती आवश्यक ठरते. त्यादृष्टीने ग्रामीण उद्योग व लघुउद्योग अत्यंत महत्त्वाचे आहेत. हे सर्व उद्योग ग्रामीण औद्योगिकरणाचे आधार आहेत. ग्रामीण उद्योग, कुटीर उद्योग व लघुउद्योग यांना राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात एक विशिष्ट स्थान आहे. ग्रामीण उद्योग, कुटीर उद्योग व लघुउद्योग हे राज्याच्या गामीण अर्थव्यवस्थेतील परंपरागत उद्योग आहेत.

राज्याच्या ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. पुर्वी आपली खेडी स्वावलंबी होती. गावाला लागणारी अन्नधान्य गावात उत्पादन केले जात असे. ज्या लोकांकडे जमीन नव्हती. ते भूमीहीन लोक ग्रामोद्योग करत असत. सुतार, लोहार, कुंभार, तेली, चर्मकार, विणकर असे अनेक कारागीर प्रत्येक गावात आपली ग्रामोद्योगी उत्पादन शेतकऱ्यांना व इतरांना विकत असतात. त्या बदल्यात त्यांना धान्य अगर इतर वस्तू दिल्या जात होत्या. ग्रामीण भागात साळी कांडणे, तिखट कुटणे दाळ सडणे, पापड बनविणे, खेळण्या बनवणे, मध जमा करणे, कातडी कमावणे, डिंक जमा करणे व पशुपालन करणे इत्यादी कुटीरोद्योग व ग्रामोद्योग अस्तित्वात होते.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर राज्यात नियोजित आर्थिक विकासाला सुरूवात झाली. राज्याच्या नागरी भागात विशेषतः मुंबई, ठाणे, नाशिक व पुणे या पट्टयांत मोठ्या प्रमाणत उद्योग निर्माण होऊ लागले. त्यामुळे ग्रामीण भागातील उद्योग बंद पडले. परीणामी ग्रामीण कारागीर बेकार झाले. रोजगारांसाठी ग्रामीण लोक खेडी सोडून शहराकडे जाऊ लागले. परंतु अलीकडच्या काळात महाराष्ट्र शासनाने औद्योगिक धोरणात बदल केला. उद्योगधंद्याच्या विकेंद्रीकरणाला

महत्त्व दिले. उद्योगाच्या रचनेत बदल केला. बहुसंख्य ग्रामीण उद्योगात व कुटीरोद्योगात यंत्र व विद्युत यांचा वापर वाढला आहे. लघुउद्योगात भांडवल गुंतवणुक वाढली व उद्योगातून अनेक प्रकारच्या वस्तू उत्पादनाचा समावेश करण्यात आला. प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण औद्योगिकरणचा अभ्यास करण्यात आला आहे.

**उदिष्टये:**

1. राज्याच्या ग्रामीण भागातील ग्रामीण व लघुउद्योगाचा अभ्यास करणे
2. राज्याच्या ग्रामीण उद्योगाच्या रचनेचा अभ्यास करणे

**ग्रामीण उद्योग:**

आर्थिक विकास आणि रोजगार निर्माण कार्यक्रम या घटकात ग्रामीण औद्योगिकरणाचे महत्त्व आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रफळात ग्रामीण क्षेत्रफळाचा वाटा 98 प्रतिशत इतका आहे. ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. कृषी क्षेत्रात गरजेपेक्षा जास्त लोक काम करतात. मोठ्या उद्योगामध्ये वाढत्या लोकांना रोजगार देण्याची क्षमता नसते. ग्रामीण भागातील वाढत्या बेरोजगारांना कृषिक्षेत्रातही रोजगार मिळत नाही. म्हणून जास्तीत जास्त रोजगार प्राप्त करून देण्यासाठी ग्रामीण औद्योगिकरणाची गरज आहे.

**ग्रामीण उद्योगांची प्रगती:**

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात कृषि क्षेत्रास महत्त्व आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येला कृषी क्षेत्रात रोजगार मिळणे शक्य नाही. मागील चार दशकाच्या काळात महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाबरोबर औद्योगिक क्षेत्राच्या रचनेत बदल झाला आहे. उद्योगांचे विकेंद्रकरण करण्यात आले आहे. ग्रामीण भागात कृषीवर आधारित व इतर ग्रामोद्योग, प्रक्रीया उद्योग निर्माण करण्यात आले आहे. राज्यातील कृषी क्षेत्रावरील लोकांचा भार कमी करून बिगर कृषी क्षेत्रात रोजगार निर्माण देण्यासाठी ग्रामीण उद्योगांची भूमिका महत्वाची आहे.

**तक्ता क्र. 1**

**ग्रामीण उद्योगांची रचना**

| बाब | 1977 | 1980 | 1990 | 1998 | 1977-98% वाढ |
|---|---|---|---|---|---|
| उद्योगांची एकूण संख्या | 170 | 965 | 1308 | 1613 | 848.13 |
| काम करणाऱ्या एकूण व्यक्ती | 963 | 2145 | 2847 | 3688 | 282.96 |
| प्रति उद्योग काम करणाऱ्यांची सरासरी संख्या | --- | 2.2 | 2.2 | 2.3 | 400 |

**संदर्भ :** 1. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (1993-1994)
2. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (2002-2003)

सन 1961 नंतरच्या काळात राज्याच्या ग्रामीण भागातील बिगर कृषी क्षेत्रातील ग्रामीण उद्योग व त्यात काम करणाऱ्या कामगारांच्या संख्येत वाढ झाली आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या रचनेत बदल झाला आहे. तक्ता क्र. 1 वरून असे स्पष्ट होते की, सन 1977-1999 या काळात राज्याच्या ग्रामीण भागातील उद्योगाच्या संख्येत 14 लाख 43 हजारांनी वाढ झाली आहे. ही वाढ शेकडा 849 ने झाली आहे. बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांच्या संख्येत 27 लाख 25 हजारांनी वाढ झाली आहे. ही वाढ शे. 283 नी झाली आहे. सन 1980 मध्ये राज्याच्या ग्रामीण भागातील प्रती उद्योगामागे काम करणाऱ्या कामगारांची

सरासरी संख्या 2.2 इतकी होती. त्यात वाढ होऊन सन 1998-1999 साली ती संख्या 2.3 इतकी झाली. म्हणजेच राज्याच्या ग्रामीण भागातील बिगर कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या संख्येत वाढ झाली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास होत आहे. ग्रामीण उद्योगात परंपरागत तंत्रज्ञानाऐवजी आधुनिक तंत्रज्ञान वापराचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे ग्रामीण उद्योगाच्या रचनेत बदल झाला आहे. तो ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला पूरक आहे.

**निष्कर्षः**

1. मागील चार दशकाच्या काळात राज्याच्या आर्थिक विकासाबरोबर ग्रामीण भागातील परंपरागत उद्योगांऐवजी आधुनिक ग्रामीण उद्योगांची संख्या वाढली आहे.
2. मागील चार दशकाच्या काळात आर्थिक विकासाबरोबर ग्रामीण अर्थव्यवस्थेतील ग्रामीण उद्योगांच्या रचनेत बदल झाला आहे
3. ग्रामीण उद्योगात आधुनिक यंत्रसामुग्री व विद्युत वापराच्या प्रमाणात वाढ झाली आहे.
4. सन 1977-98 या काळात राज्याच्या ग्रामीण भागातील उद्योगात 14.43 हजारांनी वाढ झाली आहे.
5. सन 1977-98 या काळात राज्याच्या ग्रामीण भागातील ग्रामीण उद्योगात काम करणाऱ्या एकूण व्यक्तींच्या संख्येत शे. 71.93 नी वाढ झाली आहे.
6. प्रति उद्योग काम करणाऱ्यांची संख्या शे. 4.55 नी वाढली आहे.
7. मागील चार दशकाच्या काळात ग्रामीण अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्रातील रोजगारापेक्षा बिगर कृषी क्षेत्रातील रोजगारांची संख्या अधिक वाढली आहे.

**संदर्भ** :


1. धनश्री जयंत महाजन (1996)- मराठवाडयातील जिल्हयांच्या औद्योगिक विकासाचे स्तर –अर्थबोध पृष्ठ. 43-49.
2. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था (2001) - आर. एस. सोळुंके
3. Yoginder K. Alagh (1987) Policy, Growth & Structural Changes In Indian Industries- Economic & Political Weekly, A Sameeksha Trust Publication Vol. XXII No. 19,20,21 Annual Number-1987